पुणे जिल्हा परिषद- Process Mapping -Template

विभागाचे नाव		सामान्य प्रशासन विभाग	

अ. क्र.	प्रक्रिया स्थिती (Steages of Process Mapping)	बाब	माहिती	शेरा
PC१	प्रक्रिया ओळख व वर्गीकरण (Process	प्रक्रियेचे **नाव**	वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचाऱ्यांना क्षयरोग / कर्करोग / कष्ठरोग कारणास्तव विशेष सवलत रजा मंजुर करणे.	
PC२		कार्यासन **संकेतांक** (उदा. आस्था1, लेखा 4)	**आस्था-१७**	
PP१	प्रक्रिया प्रस्तावित करणे (process proposal)	प्रक्रिया प्रस्तावित करणाऱ्या अधिकारी /कर्मचारी (Maker)- **पदनाम**	**कनिष्ठ सहाय्यक**	
PP२		संदर्भीय कायदा, नियम मॅन्युअल, अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रक, न्यायालय निकाल, शासन पुस्तके,पत्रे इत्यादी क्रमांकासह शिर्षक नमुद करावेत.	**म.ना.से.(रजा) नियम १९८१ मधील नियम ५०, ६० व ६१** - महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१ मधील परिशिष्ठ ३ मधील नियम ३ (३) नुसार क्षयरोग / कर्करोग / पक्षाघात निदान व उपचार करणा-या कर्मचारी कोणतेही वेतन घेत असला तरी, देय आणि अनुज्ञेय असलेली पूर्णवेतनी सर्व रजा त्याने संपविल्यानंतर, त्याला पूर्णवेतनी क्षयरोग रजा मंजूर करता येईल आणि अशा क्षयरोग रजेचे रजा वेतन नेहमीच्या नियमांनुसार विनियमित करण्यात येईल. एकूण क्षयरोग रजा एक वर्षापेक्षा अधिक होता कामा नये. ही रजा समाप्त झाल्यानंतर, कर्मचारी बरा होण्यासाठी आणखी रजा आवश्यक असेल तर, अर्धवेतनी रजा देय असल्यास, त्याला देण्यात येईल. अर्धवेतनी रजा समाप्त झाल्यानंतर, आणखी सेवा करण्याच्या दृष्टीने त्याच्या शारिरीक स्वास्थ्याची तपासणी करण्यासाठी त्याला वैदयकीय मंडळासमोर पाठवावे आणि या नियमांखाली मंजूर करण्यात आलेली एकुण सर्व रजा तीन वर्षापेक्षा अधिक होणार नाही हे लक्षात घेऊन त्याला वैदयकीय मंडळाने शिफारस केलेली असाधारण रजा मंजूर करावी. पूर्णवेतनी क्षयरोग रजा शासकीय कर्मचा-याच्या रजेच्या खात्यात खर्ची टाकण्यात येऊ नये.	
PP३		**प्रस्तावासोबत जोडावयाची कागदपत्रे उदा. विहित नमुन्यातील अर्ज, खरेदीचे बिल, आधार कार्ड आदी** — **लाभार्थी/ व्यक्तींची वैयक्तिक कागदपत्रे**	१. विहीत नमुन्यातील रजा अर्ज २. रजा मागणी कारणाचे अनुषंगाने आवश्यक कागदपत्रे, उदा. वैदयकीय दाखला, विशेष रजेसाठी ससून रुग्णालय, पुणे यांचेकडील वैदयकीय मंडळाचे शिफारसपत्र ३. लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र	
		कार्यालयीन कागदपत्रे	१. मुळसेवा नोंद पुस्तकातील शिल्लक असलेल्या रजेचे कार्यालय प्रमुखाचे प्रमाणपत्र २. कार्यालय प्रमुखाचे शिफारसपत्र	
PP४		प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आवश्यक उपक्रम, कामाचे वार्षिक नियोजन, परीक्षा, मेळावे, कागदपत्र तपासणी कॅम्प , विशेष मोहिमा, प्रचार प्रसिध्दी	लागु नाही	
PP५		प्रक्रिया प्रस्तावित करताना जिल्हा परिषद विभाग/ पंस/ ग्रापं/ जि. प. कडील अन्य क्षेत्रीय कार्यालये तसेच शासनाच्या विभाग/ उपक्रम/ मंडळे / महामंडळे / मनपा/ नपा/ कटकमंडळे/ खाजगी संस्था यांचेकडून प्राप्त करावयाची माहिती, मान्यता, शिफारस	लागु नाही	

PP६		तपासणी अधिकारी स्तर पदनाम (Checker) (स.प्र.अ/क.प्र.अ/ पर्यवेक्षीय अधिकारी)	कनिष्ठ प्रशासन अधिकारी	
PP७		प्रक्रिया मंजुरी देताना पडताळुन पहावयाच्या बाबी	१. विहीत नमुन्यातील रजा अर्ज २. रजा मागणी कारणाचे अनुषंगाने आवश्यक कागदपत्रे, उदा. वैदयकीय दाखला, विशेष रजेसाठी ससून रुग्णालय, पुणे यांचेकडील वैदयकीय मंडळाचे शिफारसपत्र ३. मुळसेवा नोंद पुस्तकातील शिल्लक रजा ४. लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र ५. कार्यालय प्रमुखाचे शिफारसपत्र	
PA१	प्रक्रिया मंजुरी (process approval)	मान्यता अधिकारी स्तर पदनाम (खातेप्रमुख /इतर)	उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग)	
PA२		यादी/ आराखडा मान्यता अधिकार समितीस असल्यास, समिती नाव	लागु नाही	
PA३		Endosement (समर्थन) अधिकारी स्तर पदनाम (मुकाअ /अति मुकाअ/ संबधित खातेप्रमुख)	मुख्य कार्यकारी अधिकारी	
PM१	प्रक्रिया त्रुटीशोध (process Mapping)	मंजुरी प्रक्रियेमध्ये सातत्याने आढळणाऱ्या त्रुटी	१. सादर होणारे प्रस्ताव अत्यंत विलंबाने सादर करणे, २. Unfitबाबत सक्षम वैदयकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर न करणे, ३. रजा मंजूरीसाठी कार्यालय प्रमुखाची शिफारस नसणे, ४. मुळसेवा नोंद पुस्ताकातील रजालेखा अदययावत नसणे इ. त्रुटी वारंवार दिसून येतात.	
PI१	प्रक्रिया सुधारणा (process improvization)	अचुकता वेळेची बचत , मनुष्यबळ कार्यक्षम वापर , पारदर्शकता याकरिता माहिती तंत्रज्ञानाचा व संगणक आज्ञावली वापर करता येण्याजोग्या उपप्रक्रिया /बाबी	नाही	
PI२		तांत्रिक (Technical) ज्ञान कमी पडत असल्यास प्रशिक्षण स्वरुप, अभ्यासक्रम	प्रशिक्षणाची आवश्यकता आहे	
PI३		मुळ संकल्पना, उद्देश , लेखा संहिता, प्राधिकरण यांचे अधिकार यास धक्का न लावता प्रक्रिया सुधारणे करिता शासन स्तरावर प्रस्तावित करायच्या बाबी	नाही	